# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
e-mail : desk4@dte.org.in Web : http://www.dte.org.in


कार्यालयीन आदेश

क्र. ४/आस्था/२००९/२५२५
दिनांक : १६/११/२००९

पहा : १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. बैठक १००२/(९१/२००२)/आस्था-१, दिनांक २५ जुलै, २००२
२) शासन पुरक पत्र, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. संकीर्ण-१००२/(५५३/२००२)/आस्था-१, दिनांक २७.०८.२००२
३) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण-१००२/(५५३/२००२)/ आस्था-१, दिनांक १९.०७.२००३
४) शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक एससीटी ६५०५/(१७४/०५)/तांशि ४, दिनांक २१/१०/२००५
५) शासन पत्र क्र. एससीटी ६५०५/(१७७/०५)/तांशि ४, दिनांक ०८.११.२००५
६) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. बैठक-२००७/(२१७/०७)/तांशि २, दिनांक ०२.११.२००७
७) कार्यालयीन आदेश क्र. ४/आस्था/२००७/१७९४, दिनांक ५.११.२००७
८) कार्यालयीन आदेश क्र. ४/आस्था/२००७/१७९६, दिनांक ५.११.२००७
९) कार्यालयीन आदेश क्र. ४/आस्था/२००७/१७९७, दिनांक ५.११.२००७
१०) कार्यालयीन आदेश क्र. ४/आस्था/२००७/१७९७, दिनांक ५.११.२००७
११) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. क्र. एससीटी ६५०९/(२१२/०९)/तांशि १, दिनांक १०.११.२००९

शासकीय अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयातील अध्यापकांची रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यास संदर्भीन क्र. १ ते ३ मधील आदेशातील अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूरी दिली आहे. त्याअनुषंगाने नेमलेल्या कंत्राटी अध्यापकांना संदर्भाधिन क्र. ६ च्या आदेशान्वये पुनर्नियुक्त करण्यास दिलेल्या शासन मान्यतेस अनुसरून संदर्भ क्र. ७ ते १० च्या कार्यालयीन आदेशान्वये निव्वळ कंत्राटी तत्वावर पुनर्नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत. सदर पुनर्नियुक्त करण्यात आलेल्या कंत्राटी अध्यापकांच्या करारपत्रानुसार सेवा समाप्त केल्यानंतर ज्या अध्यापकांचे मुल्यांकन समाधानकारक आहे, अशा उमेदवारांना संदर्भ क्र. ११ अन्वये निव्वळ कंत्राटी तत्वावर नियुक्ती देण्यास शासनाने मान्यता दिली आहे. त्यानुसार शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातील संदर्भ क्र. ६ च्या शासन निर्णयास अनुसरून संदर्भीन ७ ते १० च्या कार्यालयीन आदेशान्वये कार्यरत कंत्राटी अध्यापकांच्या नियुक्त्या त्यांनी दिलेल्या हमीपत्रानुसार विहित मुदतीत समाप्त करण्यात आल्या आहेत. अशाप्रकारे सेवा समाप्त केलेल्या कंत्राटी अध्यापकांपेकी ज्या अध्यापकांचे मुल्यांकन समाधानकारक आहे अशा कंत्राटी अध्यापकांना **रु. १२०००/- या ठोक वेतनावर त्यांच्या नांवासमोर दर्शविलेल्या ठिकाणी या आदेशान्वये दि. १५.११.२०११ पर्यंत किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत उमेदवार अथवा नियमित स्वरुपात नियुक्तीने उमेदवार उपलब्ध होणे यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत निव्वळ कंत्राटी तत्वावर नियुक्ती करीत आहेत.**

| अ.क्र. | उमेदवारांचे नांव व पत्ता | कंत्राटी तत्वावरील नियुक्तीचे ठिकाण व पद |
|---|---|---|
| १. | श्री. भुईभरे अमित गणेश,<br>द्वारा बी. डब्ल्यु. भुईभर, परिवार कॉलनी,<br>केशव नगर, अकोला, पि. ४४४ ००४. | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद येथे रिक्त असलेल्या अधिव्याख्याता, यंत्र अभि या पदावर |
| २. | श्री. शिलवंत डी. एस.,<br>द्वारा श्री. श्रोणपाटील नादकब्रम्ह,<br>२४, पन्नालालनगर, औरंगाबाद. | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद येथे रिक्त असलेल्या अधिव्याख्याता, अणुविद्यूत या पदावर |
| ३. | श्री. चोरगे प्रकाश ज्योतीराम,<br>३७०/बी, लालबहादूर शास्त्री नगर, शनिवार पेठ, कराड, जि.सातारा पि. ४१५ ११० | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड येथे रिक्त असलेल्या अधिव्याख्याता अणूविद्यूत या पदावर |
| ४. | श्रीमती आशा प्रभाकर चौधरी,<br>द्वारा ललीत एन. चौधरी, देविवाडा, फैजपूर, ता. यावल, जि. जळगांव पिन. ४२५ ५०३ | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद येथे रिक्त असलेल्या सिस्टीम ॲनालिस्ट या पदावर |
| ५. | श्री. पाटील महेशकुमार शांतराम,<br>७-बी, मनशांती, ओम शांती नगर, गुजरात पेट्रोल पंपासमोर, जळगांव २ | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगांव येथे रिक्त असलेल्या अधिव्याख्याता उपकरणीकरण या पदावर |
| ६. | श्रीम. भादे अर्चना वामनराव,<br>साधाना कॉलनी, दस्तूर नगर, अमरावती | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती येथे रिक्त असलेल्या अधिव्याख्याता माहिती तंत्रज्ञान या पदावर |
| ७. | श्रीम. चक्करवार व्ही. ए.,<br>१५-बी, रामानंद कॉलनी, क्रांती चौक,<br>औरंगाबाद | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद येथे रिक्त असलेल्या अधिव्याख्याता माहिती तंत्रज्ञान या पदावर |
| ८. | श्री. व्यवहारे शांतनु अशोकराव,<br>परिमल, ज्ञानेश्वर नगर, नेवासा रोड, शेवगांव,<br>जि. अहमदनगर, पिन ४१४ ५०२ | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद येथे रिक्त असलेल्या अधिव्याख्याता संगणक अभियांत्रिकी / विज्ञान (एम.सी.ए.) या पदावर |

वरील उमेदवारांच्या कंत्राटी तत्वावरील नियुक्त्या पुढील अटीच्या अधिन राहून करण्यात येत आहे.

१. **कंत्राटी तत्वावर वरील अध्यापकांची नियुक्त्या दिनांक ११.११.२०११ पर्यंत किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत अथवा नियमित स्वरुपात उमेदवार उपलब्ध होणे यापैकी जे अगोदर घडेल तेवढया कालावधीसाठी असतील, त्यानंतर या कंत्राटी नियुक्त्या आपोआप संपुष्टात येतील.**

२. वरील अध्यापकांची कंत्राटी तत्वावर नियुक्ती रु. १२०००/- (रुपये बारा हजार फक्त) या एकत्रित मासिक वेतनावर करण्यात येत असून त्यांना कोणत्याही प्रकारचे भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत.

३. संदर्भ क्र. ११ च्या शासन निर्णयासोबत जोडलेल्या जोडपत्रातील करारनामा कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारांना प्रत्यक्ष रुजू होण्यापूर्वी संबंधित संस्थेत लिहून द्यावा लागेल, अन्यथा त्यांचे नियुक्ती आदेश रद्द ठरतील.

४. **कंत्राटी तत्वावर नियुक्त अध्यापकांच्या सेवा बदलीपात्र राहणार नाहीत. मात्र प्रशासकीय कारणास्तव व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्यासाठी गरज उद्भवल्यास त्यांची इतर शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात बदली करण्यात येईल.**

**५. कंत्राटी तत्वावर नियुक्त अध्यापकांच्या नियुक्त्या त्यांचे शैक्षणिक / अध्यापनाचे काम समाधानकारक असण्यावर अवलंबून राहतील व कोणत्याही पुर्वसूचनेशिवाय संपुष्टात आणण्यात येतील व याबाबतीत संबंधित विभाग प्रमुख / प्राचार्य यांची शिफारस अंतिम राहील.**

६. कंत्राटी तत्वावर नियुक्त उमेदवारांविरुध्द विद्यार्थ्यांची तक्रार असल्यास सदर तक्रारीबाबत संबंधित विभाग प्रमुख / प्राचार्यांच्या शिफारशीनुसार त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

७. कंत्राटी तत्वावर नियुक्त करण्यात आलेल्या अध्यापकांनी या आदेशाच्या दिनांकापासून ४ दिवसांच्या आत रुजू व्हावे, जे अध्यापक दिलेल्या मुदतीत रूजू होणार नाहीत त्यांचे नियुक्तीचा आदेश आपोआप संपुष्टात येतील, त्याबाबत पुनर्विचार करण्यात येणार नाही.

८. कंत्राटी तत्वावर नियुक्त अध्यापकांच्या नियुक्त्या करारपत्रात नमुद केलेल्या कालावधीनंतर आपोआप संपुष्टांत येतील.

९. कंत्राटी तत्वावर नियुक्त केलेल्या अध्यापकांची नियुक्ती ही निव्वळ कंत्राटी पध्दतीने असल्याने संबधीतांना नियमित नियुक्तीधारकांचे लाभ मिळणार नाहीत.

१०. कंत्राटी तत्वावर नियुक्त असलेल्या अध्यापकांनी अध्यापनाबरोबरच सोपविलेली तद्नुषंगिक इतर प्रशासकीय कामे करणे बंधनकारक राहील.

११. कंत्राटी तत्वावर नियुक्त झालेल्या अध्यापकांनी, त्यांचेवर कोणत्याही प्रकारचा गुन्हा नसल्याचे किंवा कोणत्याही प्रकारचे आरोप नसल्याचे प्रतिज्ञापत्र त्यांनी स्वतंत्रपणे प्राचार्यांकडे सादर करणे आवश्यक राहील.

१२. प्रस्तुत नियुक्त्या हया नव्याने करण्यात येत असून त्या निव्वळ कंत्राटी पध्दतीने असल्यामुळे संबंधित उमेदवारांना नियमित नियुक्ती धारकांचे लाभ मिळणार नाहीत .तसेच यापूर्वीच्या कंत्राटी सेवेचा कोणताही लाभ त्यांना अनुज्ञेय असणार नाही.

१३. ज्या प्रकरणी वरील कार्यपध्दतीचे पालन करण्यात येणार नाही, त्या प्रकरणी संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन कार्यवाही करण्यात येईल.

**(डॉ. सु. का. महाजन)**
**प्र. संचालक**
**तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

**प्रत :**

**मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ यांना माहितीसाठी सादर**

**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर :**

१. कोषागार अधिकारी, औरंगाबाद, अमरावती, कराड व जळगांव (मानार्थ) (प्राचार्यांमार्फत)

२. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, औरंगाबाद, अमरावती, पुणे व नाशिक

३. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद, अमरावती, कराड व जळगांव

त्यांना कळविण्यात येते की, कंत्राटी तत्वावर नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारांचा शिकविण्याचा वस्तूनिष्ठ अहवाल दर ३ महिन्यांनी संबंधित सहसंचालक, विभागीय कार्यालये यांचेमार्फत या संचालनालयास सादर करावा.

४. संबंधित उमेदवार **(संबंधित प्राचार्यांमार्फत)**

५. कार्यासन क्रमांक ४, निवड नस्तीस